# भारत

## शेजारील राष्ट्रे आणि परराष्ट्र धोरण

डॉ. एस.एम. वाघ



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# भारत : शेजारील राष्ट्रे आणि परराष्ट्र धोरण

संपादक

प्रा.डॉ. एस. एम. वाघ

A.R.B.Garud Art's,Commerce & Science College
Shendurni Tal.Jamner,Dist.Jalgaon
LIBRARY
ACC.No.........................................
Date..................... Price.....................

अथर्व पब्लिकेशन्स्

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स्

**भारत : शेजारील राष्ट्रे आणि परराष्ट्र धोरण**

© सुरक्षित

ISBN : 978-93-86196-33-0

**प्रकाशक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स्**
**धुळे** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड,
धुळे – ४२४००१.
संपर्क ९४०५२०६२३०
**जळगाव** तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव – ४२५००१.
संपर्क ०२५७–२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल atharvapublications@gmail.com
वेबसाईट www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती–**
६ जानेवारी, २०१७

**अक्षरजुळवणी**
अथर्व पब्लिकेशन्स्

**मूल्य**
₹ ४५०/-

■ या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी – फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

■ या पुस्तकात प्रसिद्ध झालेल्या लेखांची मते ही त्या-त्या लेखकांची आहेत त्यांच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही



Scanned with CamScanner

# अनुक्रम


■ भारताच्या परराष्ट्र धोरणावरील जागतिकीकरणाचा परिणाम .... ०९
प्रा.अप्पासाहेब.एस.गमे, तलासरी, जि.पालघर

■ भारताचे परराष्ट्र धोरण – आदर्शवादाकडून वास्तववादाकडे ... १४
भालचंद्र नागनाथ बिचितकर

■ भारताची श्रीलंकेप्रती मानवाधिकार विषयी भूमिका ........... २१
प्रा.डॉ. डी.एस.कळंबे, भोकरदन जि.जालना

■ भारत–चीन सामरिक संबंध ................................ २६
दिपक बाबुलाल सिरसाट, शेंदुर्णी, जि.जळगाव

■ भारत – आसियन संबंध .................................. ३२
डॉ. ए. डी. जाधव,दिग्रस जि.यवतमाळ

■ आसियान राष्ट्रांसंदर्भात भारतीय विदेश नीति–पूर्वेकडे
पाहा पासून सक्रिय पूर्वेकडे ................................ ४०
प्रा.डॉ.अर्जुन येरगे, खानापूर, रावेर, जि.जळगाव

■ भारत – पाकिस्तान संबंध.................................. ४६
प्रा. डॉ. अतुल हणमंत कदम,कुर्डूवाडी, जि. सोलापूर

■ धर्मनिरपेक्षता व भारत ...................................... ५२
प्रा.डॉ. भगवान माधवराव लोखंडे, तळा, जि. रायगड

■ भारत चीन संबंधातील वास्तविकता आणि उपाययोजना ....... ६३
प्रा.डॉ. महेंद्र पाटील, शिरपूर जि.धुळे

■ भारत – चीन संबंधाची बिकट वाटचाल.... ................. ७२
डॉ.पंडित शेषराव नलावडे, औरंगाबाद.




Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# भारत–चीन सामरिक संबंध

दीपक बाबुलाल सिरसाट
संशोधक विद्यार्थी
आ. र. भा. गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी

भारत १९४७ साली स्वतंत्र झाला. त्यानंतर भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची दिशा निश्चित झाली. तोपर्यंत भारत ब्रिटीशांची वसाहत, एक परतंत्र राष्ट्र होते.[१] ब्रिटिशांची विदेश नीती हीच भारताची विदेश नीती होती. तथापि स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही राष्ट्रीय काँग्रेसने पक्षांतर्गत आपला एक परराष्ट्र विभाग ठेवला होता. त्यामध्ये देशाच्या दृष्टीने भावी परराष्ट्र धोरणाची आखणी होत असे.[२] या विभागाची जबाबदारी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर होती. त्यामुळे भारताचे धोरण उदार व समाजवादी असणे स्वाभाविक होते.[३] परंतु १९४७ ते २०१६ या ६९ वर्षाच्या काळात भारताची सामरिक मुत्सद्देगिरी यात बराचसा बदल झाल्याचे दिसते. किंबहुना २०१४ च्या सालबदलानंतर शेजारील राष्ट्रांच्या संबंधात फार मोठ्याप्रमाणावर बदल झाल्याचे दिसून येते. १० मार्च ते १४ मार्च (२०१४–१५) दरम्यान हिंदी महासागरावरील सेराल्स मॉरिशिस आणि श्रीलंका या देशांना भेटी दिल्या.[४] यामुळे भारताच्या धोरणात सागरी अंधत्व दूर होण्यास सुरुवात झाली. २० व्या शतकाच्या मध्यानंतर ब्रिटिशांनी हिंदी महासागरातून लक्ष कमी करून पॅसिफिक महासागरावर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली. चीनचा ४० टक्के व्यापार हिंदी महासागरातून होतो. भारतही हिंदी महासागरावर चीनचे हितसंबंध जाणतो. गेल्या काही वर्षात सागरी सिल्करूटचा प्रकल्प (मॉरिटाइम्स) रेटून चीनने अत्यंत आक्रमकपणे हिंदी महासागरात आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली त्याच्या तोडीने सागरावर प्रभाव राखणे भारताला गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाने भारत–चीन सामरिक संबंधांच्या बदलांचा मागोवा घेतला आहे.

भारत–चीन यांच्यामध्ये सामरिक सुरक्षेच्या संबधावर जागतिक राजकारणाची दिशा, स्थिरता व विकास अवलंबून आहे.[५] दोन्ही राष्ट्रांनी विवादास बाजुला ठेवून विकासाला प्राधान्य दिले तर या राष्ट्रांना एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निश्चित महत्त्व येणार आहे. त्यासाठी दोन्ही राष्ट्रांनी राजनैतिक मुत्सद्दीपणा दाखविणे गरजेचे आहे.[६] २०१४ मध्ये झालेल्या राष्ट्रप्रमुखांच्या भारतभेटीत काही महत्त्वाचे



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

करार झाले. ते म्हणजे नथ्थुला खिंडीतून कैलास मानसरोवर यांचेसाठी मंजुरी, रेल्वे, सुधारणा, व्यापार आणि विकासासाठी दोन्ही देशात करार झाले शिवाय भारताने अंतराळ संशोधन व चीनचे राष्ट्रीय अंतराळ प्रशासन यांच्यातील आकाशाचा वापर शांतता आणि सुरक्षिततेसाठी करायला करार केला व कला आणि संस्कृती विकासावर दोन्ही देशांनी भर दिलेला आहे.[७] यातून भारताचा सामरिक संबध दृढ झाल्याचे दिसते.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जपान भेट झाल्यानंतर चीनच्या राष्ट्रपतींनी भारत भेट घेतली.[८] यामध्ये चीन-जपान संशयाची अप्रत्यक्ष चिन्हे पाहावयास मिळाली. एकीकडे भारत सरकार चीनसोबत विविध करार करीत होते. तसेच १८ सप्टेंबर २०१४ मध्ये चीनचे १००० सैनिक दक्षिण लडाख येथे तात्पुरता रस्ता तयार करीत होते. याकडे भारत सरकारचे लक्ष गेल्यानंतर तो प्रश्न तात्पुरता थांबला.[९] शिवाय भारताने चीन-भारत -बांगलादेश-म्यानमार असा कॉरिडॉर तयार करून आर्थिक विकास व व्यापाराला चालना व संवाद वाढीकडे लक्ष केंद्रित केले. याशिवाय चीनने शीतयुध्दाच्या कालखंडात आशियायी राष्ट्रांचे प्रतिनिधी म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीत भारताच्या सहाय्याने सदस्यत्व मिळविले.[१०] P-५ हा दर्जा मिळवल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनने आपला आण्विक कार्यक्रम, आण्विक प्रसार बंदी कराराच्या चौकटीत विकसित केला. त्यामुळे आज चीनकडे असणारी आण्विक शक्ती जे जागतिक शांतता व सुरक्षेसाठी आव्हान आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दोन्ही देशादरम्यान सीमा प्रश्नामुळे आस्थिरतेचे वातावरण तयार होत आहे. १९६२ च्या युद्धात चीनने भारताची भूमी बळकावली आहे. अरुणाचल प्रदेश चीनचा प्रांत आहे, अशी भूमिका घेतली आहे. हा सामरिक डाव आहे. एकीकडे अरुणाचल प्रदेशावर हक्क सांगायचा व दुहेरीकडे बोलणी करून सीमा प्रश्न तेवत ठेवायचा.[११] १९९३ पासून आजपावेतो. दोन्ही देशांमध्ये विविध पातळीवर बोलणी सुरू आहे. तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे चीन-पाकिस्तान यांच्यामध्ये लष्करी व सामरिक भागीदारी भारतासाठी चिंतेचा विषय आहे. शीतयुध्दाच्या कालखंडात पाकिस्तानला अमेरिकेकडून आर्थिक व लष्करी मदत मिळत होती. आज चीन ती करीत आहे. पाकिस्तानचे ग्वादार बंदर, काराकोरम हायवे, इतर ठिकाणचा विकास चीन करीत आहे.[१२]

यातून चीन-भारत यांच्या संबंधांना बाधा येते. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दोन्ही देश एकविसाव्या शतकात सारख्या पातळीवर असून दोघांचा दबदबा वाढत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिनी संस्कृतीचा पाया बौध्द धर्मावर आधारलेला आहे.

**सामरिक धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

प्राचीन ते मध्यकालीन युगात चीन प्रगतीच्या शिखरावर होता. त्या चीनच्या



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

पूर्व भागापासून ते भुमध्य सागराच्या पश्चिम किनारपट्टीपर्यंत विद्युत व्यापारी मार्ग तयार झाला होता. त्या मार्गाने युरोप आणि चीन दरम्यान अनेक वस्तुंचा व्यापार घडत होता. ज्या मध्ये चीनच्या सिल्कने विशेष नाव कमविले होते.[१३] जर्मन भौगोलिक अभ्यासक फर्दिनादे रिक्तोफन याने सन १९७७ मध्ये या मार्गाला सिल्करोड असे नाव दिले होते.[१४] वन बेल्ट वन रोड प्रकल्पाच्या माध्यमातून गतवैभव पुन्हा प्राप्त होईल या दुर्दम्य आत्मविश्वासातून प्रकल्पातील दोन प्रमुख घटकांना सिल्क-भू- माजी आणि २१ व्या शतकातील सिल्क व्यापारी समुद्री मार्ग अशा संस्था निर्धारित करण्यात आल्या आहेत. सिल्क भू मार्गाव्दारे चीनच्या पूर्व आणि उत्तर भागांना एकीकडे मध्य आशिया, रशिया आणि युरोपमधील बाल्टिक प्रदेशांशी जोडण्यात येणार आहे.[१५]

दुसरा मार्ग पाकिस्तान, अफगाणिस्थान, पारिमाची खाडी आणि पश्चिम आशिया मार्गे युरोपच्या सीमांवर पोहोचणार आहे. यामध्ये सिल्क-भू- मार्गातील तिसऱ्या मार्गाचा भारताशी प्रत्यक्ष संबंध आहे.[१६] यामध्ये चीनच्या नेऋत्येकडील भागांना नेपाळ, भारत, (ईशान्य भारत) बांगलादेशमार्गे वेगाने समुद्रमार्गे जोडण्याची योजना आहे. सिल्क व्यापारी मार्ग चीनच्या दक्षिण किनाऱ्यावरून हिंदी महासागरामार्गे (म्हणजे दक्षिण आशियातून) पूर्व आफ्रिकेतील बंदर्गावांना जोडत युरोपमध्ये इटलीच्या किनाऱ्यापर्यंत नेण्यात येणार आहे.[१७] यावरून चीनचे व्यापारिक धोरण भारत व युरोप सारख्या देशांशी निश्चितच वाढणार आहे. त्याचा भविष्यात चीनला व्यापारी वृद्धीसाठी फायदा होणार आहे.

**चीनची वन बेल्ट वन रोड संकल्पना**

अमेरिकेच्या आशिया पॅसिफिक क्षेत्राला आधार देण्याच्या धोरणाला आणि ट्रान्स पॅसिफिक भागीदारीला चीनने वन बेल्ट वन रोडने प्रत्युत्तर दिले.[१८] आशियात, पाकिस्तान, अफगाणिस्थान, मध्य आशिया हिंदी महासागरावरील बेटे आणि आफ्रिकेचा पूर्व किनारा या विशाल प्रदेशाशी चीन केंद्रित परस्पर अवलंबन वाढल्यास आणि युरोप व रशियाशी व्यापारी संबंध बळकट झाल्यास चीनला एकटे पाडण्याचे अमेरिकेचे धोरण यशस्वी होणार नाही.[१९] या विचारातून 'वन बेल्ट वन रोड' ची संकल्पना आकारास आली आहे.

याशिवाय चीनच्या ऊर्जा गरजा भागविण्यासाठी तेल व नैसर्गिक वायू आयातीचे मार्ग या प्रकल्पाद्वारे वायव्य प्रांतातील मागासलेपणा कमी करणे हा फुटीर हेतू आहे. वायव्य व नैऋत्याकडील प्रांतातील तेल व वायूचा पुरवठा करण्यासाठी किंवा तिकडच्या वस्तूंची निर्यात करण्यासाठी चीनच्या बंदराचा उपयोग करणे खर्चाचे आणि खुल्या अर्थव्यवस्थेतील स्पर्धेच्या गणिताशी न जुळणारे आहे.[२०] वायव्य प्रांतांना पाकिस्तानचे ग्वादार बंदर जवळचे आहे. तर नैऋत्यातील



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

प्रांतांना धाक आणि कोलकाता बंदर सोयीचे आहे. चीनच्या उत्तरेकडील प्रांतांना रशियातून तेल व नैसर्गिक वायूंचा पुरवठा उपलब्ध करून देणे. त्या मार्गाने युरोपची बाजारपेठ आणणे हे आर्थिकदृष्ट्या सोयीचे आहे. चीनमधील मागासलेल्या प्रांतांना 'वन बेल्ट वन रोड' प्रकल्पातून विकासाची सुवर्णसंधी मिळणार असल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत त्यांच्याकडून केंद्र सरकारवर प्रचंड दबाव तयार झाला आहे.[२१]

**चीनचे सामारिक धोरण**

चीनने आपल्या भविष्यकालीन विकासासाठी महत्त्वाची भूमिका निर्माण केली आहे. चीनच्या स्ट्रिंग ऑफ पर्ल्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रणनीतीमध्ये चितगाँग बंदराला महत्व आहे.[२२] पाकिस्तानमधील ग्वादार, श्रीलंकेमधील, मालदिवचे माराओ आणि म्यानमारचे क्याउम्युम ही बंदरे या स्ट्रिंगचा भाग मानली जातात. जिथे चीनने आपल्या नौदलासाठी स्थान प्रस्थापित केले आहे. चितगाँगव्यतिरिक्त बांगलादेशच्या कॉक्सबझार सागरी किनाऱ्यानजीक सोनाडिया येथे चीन खोल पाण्याच्या बंदराच्या प्रयत्नात आहे.[२३] हिंदी महासागर क्षेत्रात चीनचा प्रभाव वाढला आहे. चिनी नौदलाचे आधुनिकीकरण वेगाने सुरू आहे. चीन देशी बनावटीची विमानवाहू नौका तयार करणार असल्याने पॅसिफिक क्षेत्रात आव्हान निर्माण झाले असल्याचे एका अहवालात सांगितले आहे. १९९५ पासून ते २०१५ पर्यंत चिनी नौदलामध्ये दाखल झालेल्या आणि पुढे होऊ घातलेल्या विनाशिका, पाणबुड्या, फ्रिगीट यांची माहिती, विश्लेषण यामध्ये देण्यात येत आहे.[२४]

गेल्या वर्षी अमेरिकेच्या नौदल गुप्तचर खात्यानेही या संदर्भात अहवाल दिला आहे. त्यात चिनी नौदलाकडे २६ विनाशिका, ५२ फ्रीगीट, २० कोर्वेट्स, ५६ऑम्फिबियस नौका आहेत.[२५] २०२० पर्यंत चीनकडे ७० पाणबुड्या राहणार असल्याचे त्यात म्हटले आहे. चीनच्या लष्करी सामरिक नीतीवरील व्हाईट पेपरमध्ये चिनी स्वप्न रंगवले आहे. दक्षिण चीन समुद्रावर चीनने आपला हक्क सांगितला आहे.

हिंदी महासागर क्षेत्रातून जगातील निम्म्याहून अधिक सागरी व्यापार चालतो. जगातील दोन तृतीयांश तेलाची वाहतूक या क्षेत्रातून होते. हिंदी महासागरात आजही त्याला लागून असलेल्या देशात एकूण दोन अब्ज लोक राहतात. भारताला आपल्या समुद्री तटाबरोबर हिंदी मध्य सागरातील विशेष आर्थिक क्षेत्रात संरक्षण करायचे आहे.[२६] चीनचे या भागातील अस्तित्व आणि प्रभुत्व भारताच्या हिताचे नाही. दक्षिण आणि पूर्व चीन समुद्रात चीनने आक्रमक भूमिका घेतली आहे. चीनने दक्षिण चीन समुद्रात कृत्रिम बेटांची निर्मिती केली आहे त्यावरून अमेरिका



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

व चीनचे खटके उडाले आहे. यात अमेरिका व भारत पंतप्रधानांचा पत्रव्यवहार झाला आहे. म्हणून चीनने युरोप भूमार्ग आणि सागरी मार्गाने थेट संपर्क साधण्याचा दृष्टीने 'सिल्क मार्गाद्वारे पावले टाकली आहे. स्ट्रिंग ऑफ चार्ल्स नीतीद्वारे भारताला एक प्रकारचे आव्हान चीनकडून मिळाले आहे.

**दक्षिण चीन समुद्रातील चीनचे धोरण**

दक्षिण चीन समुद्रामध्ये चीनकडून मानवनिर्मीत बेट तयार करण्यात येत आहे. चीनने संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर आपला अधिकार सांगितला आहे. त्यानुसार त्यांची वर्तवणूक त्या भागात राहिली आहे.[२७] यावर चीनने धावपट्टी व जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे तैनात केली. हा भाग जगातील मोठा व्यापार चालवण्याबरोबर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक साधनसंपत्ती असण्याची शक्यता आहे. दक्षिण चीन समुद्रावरील चीनच्या दाव्याला चीनची महत्त्वकांक्षा देखील कारणीभूत आहे.[२८]

आंतरराष्ट्रीय सागरातून मुख्य दळणवळणाच्या मार्गामध्ये अडचण होऊ नये अशी अमेरिकेची भूमिका आहे. भारताचीही हिच भूमिका आहे. पण चीनकडून या मुख्य दळणवळणाला अडचणी घातल्या गेल्यास भारताची भूमिका काय राहील याचा विचार झाला पाहिजे.

**निष्कर्ष :**

चीनने आपल्या सामारिक धोरणात खूप प्रगती केली आहे. दक्षिण चीन समुद्राबरील तिढा हा तिसऱ्या महायुद्धाची नांदी ठरायला नको, या कडे सर्व देशांची पावले पडायला हवीत– चीनने हा खोडसाळपणा सोडला नाही आणि अमेरिकेनेही आपली भूमिका बदलली नाही. तर संघर्ष अटळ आहे. या संघर्षाची झळ भारतालाही बसण्याची शक्यता आहे. चीनचा ४० टक्के व्यापार हिंदी महासागरातून होतो. भारतही हिंदी महासागरावरील चीनचे हितसंबंध जाणतो. गेल्या काही वर्षात सागरी सिल्क रुटचा प्रकल्प मॉरे टाईम्स प्रकल्प रेटून चीनने अत्यंत आक्रमकपणे हिंदी महासागरात आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली आहे. म्हणूनच चीनच्या तोडीने भारताला सागरावर प्रभाव राखणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**

१) डोके नो.त्र. – परराष्ट्र धोरण–आपले शेजारी ग्रंथांची ज्ञानयज्ञ प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती २००३ पृ.क्र. १.

२) कित्ता –

३) कित्ता –

४) दैनिक लोकसत्ता – १९ मार्च २०१५ पृ.क्र. ०७.

५) दैनिक लोकमत –२१ ऑक्टो. २०१४ पृ.क्र. ०६.

६) कित्ता

७) कित्ता



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ८) कित्ता | | |
| ९) कित्ता | | |
| १०) कित्ता | | |
| ११) कित्ता | | |
| १२) दैनिक लोकसत्ता | – | १९ मार्च २०१५ पृ.क्र. ०७. |
| १३) दैनिक लोकसत्ता | – | १५ फेब्रु. २०१६ पृ.क्र. ०७. |
| १४) कित्ता | | |
| १५) कित्ता | | |
| १६) कित्ता | | |
| १७) कित्ता | | |
| १८) उपरोक्त | – | १५ फेब्रु. २०१६ पृ.क्र. ०७. |
| १९) कित्ता | | |
| २०) कित्ता | | |
| २१) कित्ता | | |
| २२) दैनिक लोकसत्ता | – | १९ जून. २०१५ पृ.क्र. ०७. |
| २३) कित्ता | | |
| २४) महाराष्ट्र टाईम्स | – | ४ जाने. २०१६ पृ.क्र. ०९. |
| २५) कित्ता | | |
| २६) कित्ता | | |
| २७) कित्ता | | |
| २८) दैनिक लोकसत्ता | – | २ मार्च २०१६ पृ.क्र. ०९. |

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner